# राज्यातील शाळांमध्ये सैनिकी शिक्षण मिळणार

## माजी सैनिकांमार्फत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणार





**मुंबई–** राज्यातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत 'आनंददायी शनिवार' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात स्वयंसेवी पद्धतीने काम करणाऱ्या माजी सैनिकांच्या अनुभवातून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याच्या निर्णयामुळे शिस्त, देशभक्ती, नेतृत्वगुण आणि समाजसेवेचे उत्तम उदाहरण असलेल्या माजी सैनिकांचे प्रशिक्षण आता थेट विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणार असल्याने राष्ट्रनिर्मितीचे हे सशक्त पाऊल ठरेल, असे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सांगितले.


माजी सैनिकांमार्फत शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्याबाबत मंत्रालयातील दालनात काही दिवसांपूर्वी आढावा बैठक झाली. यावेळी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे म्हणाले की, राज्यात दरवर्षी जवळपास पाच हजार सैनिक सेवानिवृत्त होतात. त्यातील प्रत्येक जिल्ह्यातील स्वयंसेवी पद्धतीने काम करणाऱ्या निवडक आणि गुणवत्तापूर्ण माजी सैनिकांची यादी तयार करून हा उपक्रम कशा पद्धतीने राबविता येईल याविषयीचे सविस्तर नियोजन करण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण तसेच शहरी भागातील विद्यार्थ्यांना सैनिकी जीवनाची मूलभूत ओळख होणार आहे. या उपक्रमाद्वारे शाळांमध्ये कवायती, शारीरिक प्रशिक्षण, ऐतिहासिक सहली, युद्ध संग्रहालयांना भेटी, प्रेरणादायी व्याख्याने व चित्रफिती यांसारखे उपक्रम प्रभावीपणे राबविले जाणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, राष्ट्रीय एकात्मतेची भावना आणि सामाजिक बांधिलकी निर्माण होण्यास मदत होणार असल्याचेही मंत्री दादा भुसे यांनी सांगितले.

सुरूवातीला हा उपक्रम प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात येणार असून त्यानंतर राज्यात सर्व शाळांमध्ये राबविण्याबाबत सूचना देण्यात येणार आहेत. शालेय जीवनात देशसेवेचे बीज रोवण्याचा आणि सशक्त राष्ट्र घडवण्याचा महत्त्वाकांक्षी विचार आता प्रत्यक्षात उतरतो आहे, ही निश्चितच महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब असल्याचेही यावेळी दादा भुसे यांनी सांगितले. सेवानिवृत्त सैनिकांकडे केवळ युद्धकलेचेच नाही, तर कठोर प्रशिक्षण, कठीण परिस्थितीशी लढण्याची मानसिकता आणि सहकार्य यांसारख्या अनमोल कौशल्यांचा ठेवा असतो. हे सर्व गुण विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी उपयुक्त ठरणार आहेत. हा उपक्रम केवळ शिक्षण क्षेत्रातच नव्हे, तर राष्ट्रनिर्मितीच्या दिशेने एक महत्वाचे पाऊल ठरणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच शिस्त, स्वाभिमान, आणि देशासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा यामुळे निर्माण होईल, असा विश्वास माजी सैनिक कल्याण मंत्री शंभुराज देसाई यांनी व्यक्त केला.

या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन, माजी सैनिकांची निवड, प्रशिक्षण आणि देखरेख यासाठी महाराष्ट्र राज्य सैनिक महामंडळ प्रभावी भूमिका बजावणार आहे. त्यामुळे उपक्रमाची अंमलबजावणी शिस्तबद्ध आणि प्रभावीपणे होण्यासाठी शालेय शिक्षण विभाग आणि माजी सैनिक कल्याण विभाग यांच्या समन्वयाने काम करण्यात येणार आहे.

# अंगणवाडी सेविकांना मिळणार शिक्षकांचा दर्जा

## आता चिमुकल्यांना देणार ज्ञानाचे धडे




**मुंबई–** राज्य सरकारच्या शालेय शिक्षण विभागामार्फत २०२५–२६ या शैक्षणिक वर्षापासून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू होणार आहे. अंगणवाडी सेविकांना शिक्षकांचा दर्जा मिळणार आहे. अंगणवाडी सेविका आता चिमुकल्यांना ज्ञानाचे धडे देणार आहेत. या अंतर्गत अंगणवाडी आणि इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्णतः बदलण्यात येणार आहे. त्यानुसार प्राथमिक शाळांतील पहिलीच्या शिक्षकांना तसेच अंगणवाडी सेविकांना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

राज्यातील ५५३ एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत तब्बल १ लाख १० हजार ५५६ अंगणवाड्या कार्यरत आहेत. त्यामध्ये सव्वा लाखांपेक्षा अधिक अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत. यापैकी इयत्ता बारावी उत्तीर्ण सेविकांना प्राथमिक टप्प्यात सहा महिन्यांचे आणि दहावी उत्तीर्ण सेविकांना एक वर्षाचे बालशिक्षण प्रशिक्षण दिले जाणार आहे.

या प्रशिक्षणाद्वारे सेविकांना ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना कसे शिकवायचे, त्यांच्या भावनिक, सामाजिक आणि बौद्धिक विकासासाठी कोणत्या उपक्रमांचा वापर करायचा, याचे मार्गदर्शन दिले जाणार आहे. विशेष म्हणजे, पालकांनाही या प्रक्रियेत सामावून घेतले जाणार आहे, जेणेकरून घर आणि अंगणवाडीत एकसंघ विकास वातावरण निर्माण होईल.

**खेळत खेळत शिक्षण, शिकवण्याची नवी पद्धत**

नवीन धोरणात मनोरंजनातून शिक्षण म्हणजेच खेळत खेळत शिक्षण या तत्त्वाला अधिक प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे, चिमुकल्यांना शाळेची गोडी लागावी आणि ती कायम राहावी, यावर भर दिला जात आहे. अक्षर, अंक, रंग, आकार ओळख, शब्दांचे उच्चार, मुळाक्षरे हे शिक्षण आता सेविका अधिक प्रभावी आणि सर्जनशील पद्धतीने देतील.

**प्रशिक्षणासाठी कार्यशाळांचा आधार**

सर्व अंगणवाडी सेविकांना एकाच पातळीवर आणण्यासाठी,त्यांना बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकवण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमासाठी 'डायट' (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था) मार्फत एकूण ८ कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असून आतापर्यंत २ कार्यशाळा पार पडल्या आहेत.

–बारावी उत्तीर्ण सेविकांना ६ महिने ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाईल.

–दहावी उत्तीर्ण सेविकांसाठी हा कालावधी एक वर्षाचा असणार आहे.

– या अभ्यासक्रमात शिक्षणाचे तंत्र, अध्यापन कौशल्ये, खेळावर आधारित शिकवण्याच्या पद्धती यांचा समावेश असणार आहे.

**अंगणवाडी सेविकांची भूमिका आता शिक्षिकेप्रमाणेच**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार, अंगणवाडी सेविकांची भूमिका केवळ देखरेख करणाऱ्या व्यक्तीपुरती मर्यादित राहणार नाही, तर त्या प्रत्यक्ष अध्यापन करणाऱ्या शिक्षिकेप्रमाणे काम करणार आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढण्यास मदत होणार आहे.

# राज्यात ४००० नवीन ईलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन उभारणार

## सरकार १० लाखांची सबसिडी देणार



**मुंबई–** राज्यात ईव्ही पॉलिसी म्हणजेच ईलेक्ट्रिक वाहन धोरण लागू झाले आहे. हे धोरण २०३० पर्यंत लागू राहील. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक अशा येत्या पाच वर्षांसाठी १ हजार ९९३ कोटी रुपयांच्या निधीच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली. या धोरणामुळे इलेक्ट्रिक वाहनांचे उत्पादन व वापरास मोठ्या प्रमाणावर चालना मिळणार आहे. चार्जिंग विषयक पायाभूत सुविधांचा विस्तार करून आणि पर्यावरणीय शाश्वतता, आर्थिक वाढ व उर्जा सुरक्षिततेमध्ये योगदान देणाऱ्या शाश्वत आणि नाविन्यपूर्ण परिवहन उपाययोजनांना प्रोत्साहन दिले जाणार आहे. यामुळे राज्यात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर व विक्रीमध्ये मोठी वाढ अपेक्षित आहे. नवीन इलेक्ट्रिक वाहन धोरणाच्या अंतर्गत इलेक्ट्रिक वाहनांसोबतच चार्जिंग स्टेशन उभारण्यासाठी सुद्धा सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यानुसार, ५० ते २५० किलो व्हॅटपेक्षा कमी क्षमतेच्या चार्जिंग स्टेशनला ५ लाख रुपयांपर्यंत सूट मिळणार आहे. तर २५० ते ५०० केव्हीच्या चार्जिंग स्टेशनसाठी १० लाख रुपयांपर्यंत सूट मिळणार आहे. शहरी आणि ग्रामीण भागात इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन असणे आवश्यक आहे. राज्यात ४१३५ चार्जिंग स्टेशनसाठी सबसिडी देण्यात येणार आहे.

**एका चार्जिंग स्टेशनसाठी किती खर्च येतो?**

५० ते २५० किलो व्हॅटपेक्षा क्षमतेच्या चार्जिंग स्टेशनसाठी १० ते २५ लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. यावर ५ लाख रुपयांपर्यंतची सबसिडी मिळू शकते. तर २५० ते ५०० केव्हीच्या चार्जिंग स्टेशनसाठी २५ लाख ते ५० लाख रुपयांपर्यंत खर्च येतो. यासाठी १० लाख रुपये सबसिडी मिळू शकते.

पान १ वरुन

## जिल्ह्यात ११० टक्के पाऊस

विदर्भातील शिंदेवाही (चंद्रपूर) येथे १००टक्के, मराठवाडा विभागातील परभणी येथे ११० टक्के, कोकण विभागाती दापोली येथे १०६टक्के, उत्तर महाराष्ट्रातील निफाड येथे ११३ टक्के, धुळे येथे १००टक्के, जळगाव येथे १००टक्के तर पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर येथे १०१टक्के, कराड येथे १०८ टक्के, पाडेगाव ११५टक्के, सोलापूर येथे १०३टक्के, राहुरी येथे ११०टक्के तर पुणे येथे ११५ टक्के पाऊस असणार आहे, असेही डॉ. साबळे यांनी सांगितले.

## नगर आणि जामखेडमध्ये गोळीबार, दोघे जखमी

दिशेने तीन गोळ्या झाडल्या. यामध्ये एक गोळी आदित्य यांचा मित्र कुणाल बंडू पवार (रा. पोकळे वस्ती, जामखेड) यांच्या पायावर लागली. त्यांच्यावर नगर येथील खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी आदित्य यांच्या फिर्यादीवरून जामखेड पोलीस ठाण्यात खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना तपासाचे आदेश दिले. पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांच्या नेतृत्वाखालील दोन पथकांनी गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे प्रवरासंगम (ता. नेवासा) येथे सापळा रचून सहा संशयित आरोपींना ताब्यात घेतले. यामध्ये प्रभु रायभान भालेकर (रा. निपाणी, जि. छत्रपती संभाजीनगर), नकुल विष्णु मुळे (रा. खेर्डा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर), शरद अंकुशराव शिंदे (रा. पुसेगाव, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर), गणेश गोविंद आरगडे (रा. खंडाळा, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर), रावबहादूर श्रीधर हारकळ (रा. बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर) व सुशील ताराचंद गांगवे (रा. पद्मपुरा, छत्रपती संभाजीनगर) यांचा समावेश आहे. त्यांच्याकडून फायरिंगमध्ये वापरलेले लायसन्सचे पिस्टल, एक जिवंत राऊंड, दोन रिकाम्या पुंगळ्या तसेच दोन वाहने जप्त करण्यात आली. सहायक निरीक्षक हेमंत थोरात, उपनिरीक्षक अनंत सालगुडे, अंमलदार अतुल लोटके, शाहीद शेख, संदीप दरंदले, रोहित येमुल, किशोर शिरसाठ, गणेश धोत्रे, संतोष लोढे, फुरकान शेख, विजय ठोंबरे, सागर ससाणे, अमृत आढाव, रोहित मिसाळ, प्रशांत राठोड, भगवान धुळे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

दुसरी घटना सोमवारी पहाटे १२.३० वाजता अहिल्यानगर शहरातील तपोवन रस्ता, ढवण वस्ती येथील इंडो आयरीश हॉस्पिटल समोर घडली. प्रमोद रामदास घोडके (वय २४, रा. दर्गादायरा, अहिल्यानगर) व त्यांच्या मित्रांना ऋषी ढवण याच्याशी संबंध ठेवू नये म्हणून पाच जणांनी मारहाण केली व भिमराज आव्हाड या संशयिताने पिस्टलमधून दोन फायर करत जीवे मारण्याचा प्रयत्न केलाचा प्रकार घडला. या घटनेप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पहाटे गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. गुन्हा करून पसार झालेल्या तिघांना रात्रीतून ताब्यात घेतले. यामध्ये मयुर नंदकुमार फणसे (वय ३९), आकाश रोहीदास नसाणे (वय २५) व कुणाल विनायक मराठे (वय ३०, रा. ढवण वस्ती, तपोवन रस्ता) यांचा समावेश आहे. दरम्यान, गोळीबार करणारा भिमराज आव्हाड व राहुल विजय सांगळे हे संशयित पसार असून, त्यांचा शोध सुरू आहे.

**पांगरमल दारूकांडातील आरोपीकडून गोळीबार**

तपोवन रस्त्यावरील घडलेल्या गुन्ह्यात पसार असलेला संशयित आरोपी भिमराज आव्हाड व राहुल सांगळे हे सराईत गुन्हेगार आहेत. ते गुन्हा घडल्यानंतर पसार झाले आहेत. त्यांची सावेडी उपनगरात दहशत आहे. वर्चस्व वादातून गोळीबाराची घटना घडली असल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासातून समोर आले आहे. दरम्यान, भिमराज आव्हाड हा पांगरमल दारूकांड प्रकारातील संशयित आरोपी असून तो सध्या जामीनावर बाहेर आहे. त्यानेच गोळीबार केला असल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. त्याचा जामीन रद्द करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे अधीक्षक घार्गे यांनी सांगितले.

## हेक्टरी ५० हजारांची मदत करा!

मिळाली पाहिजे. सरकारने ३ हेक्टरचा निकष बदलून २ हेक्टर केला हे आणखी अन्यायकारक आहे, अशी टीका थोरात यांनी केली. पीक विम्याचे निकष बदलल्याने त्यातूनही फारशी मदत मिळत नाही. सरकारने पंचनामे करण्याचे आदेश दिले, पण प्रत्यक्षात प्रशासन काम करताना दिसत नाही. पालकमंत्र्यांनी जिल्ह्याचा दौरा करून आढावा घेतला पाहिजे, पण तसे होताना दिसत नाही. आज कांद्याला एकरी ६० हजार रुपये खर्च येतो तर टोमॅटोला एकरी ५० हजारांचा खर्च येतो. शेती करणे महाग झाले आहे. सरकारने अशा संकटावेळी शेतकऱ्याला भरीव मदत दिली पाहिजे, असेही थोरात म्हणाले.

**कृषीमंत्री कोकाटेंनाही टोला**

थोरात यांनी यावेळी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या विधानाचा समाचार घेतला. कृषीमंत्री हे पद महत्वाचे आहे. मी स्वतः या विभागाचा मंत्री होतो. शरद पवार केंद्रीय कृषी मंत्री होते. पण कोकाटे यांना कृषी मंत्रिपद म्हणजे ओसाड गावची पाटीलकी का वाटते हे माहित नाही. कृषी मंत्रालय ओसाड गावची पाटीलकी आहे तर मग बागायती विभाग कोणता हे त्यांनी सांगावे, असा सणसणीत टोला थोरात यांनी लगावला.

## आता आयकर पडताळणी

राज्यभरात नेमक्या लाडक्या बहिणी योजनेत पात्र महिलांची संख्या किती हे आता आयकर विभाग सरकारला सांगणार आहे .ही माहिती मिळवण्यासाठी गेल्या अनेक दिवसांपासून राज्य सरकारचा केंद्रशी संपर्क सुरू आहे .या माहितीवरून लाभार्थी महिलांची पडताळणी करून अडीच लाखांच्यावर ज्यांचे उत्पन्न आहे अशा महिलांसाठी लाडकी बहीण योजना बंद केली जाणार आहे. महाराष्ट्राच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी या योजनेसाठी अपात्र असलेल्या २२०० हून अधिक सरकारी कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळाला असल्याचं सांगितलं होतं. लाभार्थ्यांची पडताळणी ही कोणत्याही योजनेच्या अंमलबजावणीतील नियमित प्रक्रिया आहे त्यामुळे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीत पडताळणीची प्रक्रिया राबवली जात असल्याचं मंत्री अदिती तटकरे यांनी माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलं होतं. या प्रक्रियेत जवळपास दोन लाख अर्जांची पडताळणी केल्यानंतर जवळपास २२८२ सरकारी कर्मचाऱ्यांनी मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा लाभ घेतल्याचं आढळून आलं. यानंतर अडीच लाखांच्यावर उत्पन्न असणाऱ्या लाभार्थी महिलांची पडताळणी करून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या महिलांसाठी बंद केली जाणार आहे .आता राज्यभरात किती पात्र महिला आणि किती अपात्र महिला आहेत याची सगळी माहिती राज्य सरकारला आयकर विभाग देणार आहे. त्यामुळे एकूणच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पडताळणीत या डेटाची मदत होणार आहे.

या योजनेत सुमारे दोन कोटी ६५ लाख लाभार्थी महिलांनी नोंदणी केली होती .त्यापैकी अडीच कोटी लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात दरमहा १५०० रुपये जमा होत आहेत . या योजनेच्या सर्व अटी व शर्ती बघितल्यास राज्यभरातून साधारण एक कोटी २० लाख महिलाच योजनेसाठी पात्र ठरण्याची शक्यता आहे .

**कोणकोणत्या कारणांमुळे महिलांना अपात्र ठरवण्यात आलं?**

२.३० लाख महिला – संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थी

१.१० लाख महिला – वय ६५ वर्षांहून अधिक असल्याने

१.६० लाख महिला – चारचाकी वाहनं असल्यामुळे

७.७० लाख महिला – नमो शेतकरी योजनेच्या लाभार्थ्या असल्याने

२,६५२ महिला – सरकारी सेवेत कार्यरत असल्याने

**लाडकी बहिण योजना**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांपूर्वी ऑगस्ट २०२४ ला राज्य सरकारने मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजना सुरू केली होती.२१ ते ६५ वयोगटातील महिलांना ज्यांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी आहे त्यांना दरमहा १५०० रुपयांची मदत या योजनेतून देण्यात येते .ज्या सरकारी कर्मचाऱ्यांचे उत्पन्न सामान्य मर्यादेपेक्षा जास्त असते त्यांना या योजनेअंतर्गत देयके देणे अपात्र ठरते.

## आज आयपीएलचा अंतिम सामना

अहमदाबादमध्ये आयपीएलचा अंतिम सामना पाहण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. ८ मे रोजी धर्मशाळा येथे होणारा पंजाब–दिल्ली सामना पाकिस्तानने केलेल्या ड्रोन हल्ल्यामुळे मध्यंतरी थांबवण्यात आला होता. दुसऱ्याच दिवशी, बीसीसीआयने आयपीएल एका आठवड्यासाठी पुढे ढकलले. युद्धबंदीच्या घोषणेनंतर, बीसीसीआयने आयपीएलच्या उर्वरित १६ सामन्यांचे वेळापत्रक जाहीर केले. ऑपरेशन सिंदूरपासून, बीसीसीआयने सातत्याने सशस्त्र दलांशी एकता दाखवली आहे. ऑपरेशन सिंदूर नंतर १६ आयपीएल सामने खेळवण्यात आले. बहुतेक सामन्यांमध्ये राष्ट्रगीत वाजवले गेले. तसेच स्टेडियममधील महाकाय स्क्रीनवर मधन्यवाद, सशस्त्र दल असा संदेश दाखवण्यात आला. पूर्वी आयपीएलमध्ये राष्ट्रगीत वाजवले जात नव्हते. आयपीएल सामन्यांमध्ये राष्ट्रगीतची मागणी बऱ्याच काळापासून होत आहे. आयपीएल संघ किंग्ज इलेव्हन पंजाबचे सह–मालक नेस वाडिया यांनीही २०१९ मध्ये ही मागणी मांडली होती. इतकेच नाही तर त्यांनी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाला याबाबत पत्रही लिहिले.

## गुन्हेगारीवर कडक कारवाई, गोवंश हत्या सहन केली जाणार नाही

अंमलबजावणी प्रभावीपणे केली जाईल. सोनसाखळी चोरीच्या घटना रोखण्यासाठी महत्त्वाच्या ठिकाणी गस्त वाढवली जाईल. गावठी शस्त्रांचा शोध, महिलाविषयक गुन्ह्यांचे अन्वेषण, आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींवर सतत लक्ष ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

गोवंश हत्या कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही, अशा कठोर शब्दांत अधीक्षक घार्गे यांनी आपली भूमिका मांडली. संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. जातीय तणाव निर्माण होणार नाही, याची काळजी घेण्याचे निर्देशही पोलीस दलाला देण्यात आले आहेत. अहिल्यानगर शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू असून, दोन दिवसांपूर्वी झालेल्या बदल्यांमध्ये वाहतूक शाखेतील मनुष्यबळ वाढवण्यात आले आहे. महापालिका, आरटीओ यांच्याशी समन्वय साधून वाहतूक सुरळीत करण्याचे नियोजन आहे. आर्थिक गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांवरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. विशेषतः पतसंस्थांमधील गैरव्यवहारामुळे गुंतवणूकदारांना होणाऱ्या नुकसानीला आळा घालण्यासाठी, या विषयात रस असलेल्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा ठाम अंमल करून जिल्ह्यातील नागरिकांना सुरक्षितता आणि शांततेचा विश्वास देण्याच्या दृष्टीने काम केले जाईल असे अधीक्षक घार्गे यांनी सांगितले.

**बांगलादेशी घुसखोरांचा शोध, तंत्रज्ञानाचा वापर**

जिल्ह्यात बांगलादेशी घुसखोरी असल्याच्या पार्श्वभूमीवर, पोलीस ठाण्यांच्या दहशतवाद विरोधी कक्षातील अधिकाऱ्यांची विशेष बैठक घेण्यात आली असून, त्यांना या घुसखोरांचा शोध घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. समाजमाध्यमे व अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ही मोहीम राबवली जाणार असल्याचेही अधीक्षक घार्गे यांनी स्पष्ट केले.

## शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत मदत सरकारचा मदतीचा हात आखडता

नागरिक, शेतकरी यांना मदत देण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीची स्थापना करण्यात आली आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून अवेळी पाऊस, अतिवृष्टी, वीज कोसळणे, समुद्राचे उधाण, वीज, चक्रीवादळ, दुष्काळ, भूकंप, आग, पूर, त्सुनामी, गारपीट, दरड कोसळणे, ढगफुटी, टोळधाड, थंडीची लाट, कडाक्याची थंडी या नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना मदत दिली जाते. राज्य सरकाने २३ जानेवारी २०२३ च्या शासन निर्णयाद्वारे राज्य आपत्ती प्रतिसादाच्या निकष आणि दरामध्ये सुधारण केली आहे. त्यानुसार ३३ टक्क्यापेक्षा अधिक शेती पिकांचे नुकसान झाल्यास दोन हेक्टरच्या मर्यादेत नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. त्यानुसार कोरडवाहू क्षेत्रासाठी प्रतिहेक्टर ८,५०० रुपये आणि पेरणी क्षेत्राच्या मर्यादेत, आश्वासित जलसिंचन योजनेखालील क्षेत्रासाठी प्रतिहेक्टर १७ हजार रुपये आणि पेरणी क्षेत्राच्या मर्यादेत तसेच सर्व प्रकारच्या बहुवार्षिक पिकांकरिता प्रति हेक्टर २२ हजार ५०० रुपये मदत देण्याचे यामध्ये नमूद केले आहे.

गेल्यावर्षी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारने नोव्हेंबर २०२३ मध्ये पडलेल्या अवकाळी पाऊस, गारपिटीमुळे राज्यातील बाधित शेतकऱ्यांना खूष करण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषाबाहेर जाऊन वाढीव दराने अनुदान स्वरुपात मदत देण्याचा निर्णय घेतला होता. त्यासंदर्भात १ जानेवारी २०२४ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयात जमिनीची मर्यादा दोन हेक्टरवरून तीन हेक्टर केली होती. त्यामध्ये जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी प्रतिहेक्टर १३ हजार ६०० रुपये, बागायत पिकांच्या नुकसानीसाठी प्रतिहेक्टर २७ हजार रुपये आणि बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी प्रतिहेक्टर ३६ हजार रुपये देण्याचे म्हटले आहे. मात्र, यावर्षी एप्रिल, मे महिन्यात झालेल्या अवकाळी आणि अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. मुख्यमंत्र्यांनी बाधित क्षेत्राचे पंचनामे तातडीने करण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, २७ मे रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत १ जानेवारी २०२४ च्या शासन निर्णयाद्वारे घोषित केलेले दर रद्द करून त्याऐवजी आता पुन्हा २३ जानेवारी २०२३ च्या शासन निर्णयानुसार दोन हेक्टरच्या मर्यादेत शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यावरील कर्जाचा डोंगर आणि लाडक्या बहिणींना दिल्या जाणाऱ्या अनुदानामुळे सरकारने अनेक गोष्टींवर मर्यादा आणल्या आहेत. त्यामुळेच शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाईपोटी दिल्या जाणाऱ्या जमिनीची मर्यादा कमी करण्याचा सरकारने निर्णय घेतल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

## नीट परीक्षा पुढे ढकलली

परीक्षाही पुढे ढकलण्यात आल्याचं जाहीर करण्यात आलं आहे. नीटच्या परीक्षेमध्ये अधिक पारदर्शकता येण्यासाठी ती दोन शिफ्टमध्ये न घेता एकाच शिफ्टमध्ये घेण्यात येणार आहे. त्यासाठी आधी नियोजित केंद्रांपेक्षा अधिक केंद्रांची आणि इतर मूलभूत गोष्टींची गरज पडणार आहे. त्यामुळेच ही परीक्षा पुढे ढकलण्यात येणार आहे. या संबंधित पुढची तारीख ही लवकरच जाहीर करण्यात येईल असं नॅशनल बोर्ड ऑफ एज्युकेशनने स्पष्ट केलं आहे.

**ॲडमिट कार्ड चार दिवस आधी**

नवी तारीख जाहीर झाल्यानंतर परीक्षेच्या चार दिवस आधी ॲडमिट कार्ड उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. अधिकृत वेबसाइट वर हे ॲडमिट कार्ड उपलब्ध करून दिले जाणार आहे. अर्ज क्रमांक आणि जन्मतारीख वापरून उमेदवारांना ते डाऊनलोड करता येईल. ॲडमिट कार्डशिवाय कोणत्याही उमेदवाराला परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही.

## जिल्ह्यातील ११ नायब तहसीलदारांच्या बदल्या

बदली झाली. अकोले येथील संजय गांधी योजनेचे नायब तहसीलदार एम. ए. माळवे यांची संगमनेर उपविभागीय कार्यालयात बदली झाली. श्रीरामपूरचे निवासी नायब तहसीलदार राजेंद्र वाकचौरे यांची निवडणूक शाखेत बदली झाली. पारनेरचे निवासी निवासी नायब तहसीलदार जी. आर. आढारी यांची संगमनेरला संजय गांधी योजनेत बदली झाली. चोपडा (जि.जळगाव) येथून सचिन किसन बांबडे यांची अकोले येथे संजय गांधी योजनेत नायब तहसीलदारपदी बदली झाली आहे.

## निवडणुकीचा बिगुल वाजणार?

सुरुवात केली आहे. प्रभाग रचनेच्या प्रक्रियेसाठी आयोगाने राज्य सरकारला आवश्यक सूचना दिल्या आहेत.